“मुंबई उपनरातील अनाथ मुलांचा एक चिकित्सक अभ्यास”

पीएच.डी.(समाजकार्य) (संक्षिप्त टीपण)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या समाजकार्य पारंगत (पीएच.डी) अभ्यासक्रमाच्या आंशिक पुर्ततेसाठी प्रस्तुत लघुशोध प्रबंध नांदेड विद्यापीठास सादर करण्यात येत आहे.

संशोधक

मोहिणी नारायणराव नाबदे

(पीएच.डी.प्रशिक्षणार्थी)

मार्गदर्शक

प्रो.डॉ.पी.पी.लोखंडे

(एमएसडब्ल्यू, पीएच.डी,सेट)

सहाय्यक प्राध्यापक

जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय सीडको,नांदेड

सन २०१७.

अभ्यास विषयाचे संक्षिप्त अहवाल (Synopsis)

"मुंबई उपनगरातील अनाथ मुलांचा एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना

अनाथ या शव्दाचा अर्थ ज्या मुंलाचे आई आणि वडील हे दोन्ही मृत आहेत अशी मुले. तसेच आई व वडील यांपैकी एक जरी मयत असला तरी त्यास अनाथ म्हटले जाते. काही वेळेस ज्या मुंलाचे आई आणि वडील हे दोघेही मृत्यू पावल्यास अशा मुलांना संपूर्ण अनाथ म्हणून तर दोहोंपैकी केवळ एक जण नसेल तर अशा बालकांना अर्ध अनाथ म्हणून संबोधण्यात येते. बहुतेकदा आई-वडील वा दोहोपैकी एकाचा मृत्यू झाल्यामुळे अशा मुलांच्या पालनपोषणाचा प्रश्न निर्माण होतो. अनाथ मुलांचे संगोपन करणे, त्यांना स्नेह , वात्सल्य देणे, त्यांचे सामाजिक , शैक्षणिक , आरोग्यविषयक व कौटुंबिक दृष्टिने पुनर्वसन करणे गरजेचे असते.

अनाथ मुलांची समस्या ही प्राचीन समस्या असून ती जागतीक स्वरूपाची आहे. विशेषतः भारतात वरचेवर आधुनिकतेच्या कारणामुळे ही समस्या अधीक तीव्र होत चालली आहे. आपल्या भारत देशात जेवढ्या समस्या आहेत, तेवढ्या समस्या इतर विकसनशील किंवा विकसित राष्ट्रांना भेडसावत नाहीत.

जसे : वाढती लोकसंख्या, बेकारी, दारिद्रय, भुकबळी, अंधश्रध्दा, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रियांच्या बालकांच्या , अपंगाच्या , वृध्दाच्या अशा अनेक सामाजिक समस्या आपल्या देशासमोर फार मोठी आव्हाने आहेत.

पूर्वी अशा अनाथ व निराधार मुलांची देखभाल संयुक्त कुटुंबात नातेवाईक व जातिव्यवस्था किंवा स्थानिक समुदायात घेतली जात असे. परंतु या संस्था आता दुर्बल झाल्यामुळे अशा मुलांचे संगोपन शासकीय व स्वंयसेवी संस्थांद्वारे केले जाते.

अनाथ मुलांपैकी काही शासकीय किंवा स्वंयसेवी संस्थात राहतात तर काही कोर्ट ऑफ वार्डने नेमलेल्या पालकांकडे राहतात. अशा संस्था मुलांना पालकत्व देऊन त्यांच्यासाठी संगोपन, शिक्षण, आरोग्य इत्यादी सुविधा पुरवून या मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मदत करतात.

बालकल्याण

गेल्या पाच दशकात भारतातील समाजकल्याणामध्ये व त्याच्या संदर्भात असणाऱ्या बाबींमध्ये महत्वाचे बदल घडून आलेले आहेत. सामाजिकदृष्ट्या दुर्बल मुलांसाठी असलेल्या कल्याणकारी सुविधांचा लक्षपूर्वक अभ्यास केला असता त्यांचा कल हा बालकाची वृध्दी व विकासाबाबत असलेला दिसून येतो. अभूतपूर्व कल्याणकारी सुविधा ह्या मुख्यतः सुधारात्मक होत्या. कालांतराने स्वयंसेवी संस्थांनी प्रतिबंधात्मक सुविधांना प्राध्यान्य दिले व त्या सुविधा आपल्या कार्यक्रमाचा भाग बनवल्या. सध्याच्या परिस्थितीत सरकार व स्वयंसेवी संस्था यांनी प्रतिबंधात्मक, सुधारात्मक व रचनात्मक प्रकारच्या सुविधांची आवश्यकता मान्य करून अशा सुविधा सुरू केलेल्या आहेत.

मुले ही राष्ट्राची संपत्ती आहेत. मुलांचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास. मुलांचे मन गृहणशील असते. अर्थात अनुवंशिकतेचा आणि परिस्थितीचा बालकावर परिणाम होतो. म्हणून मुलांची जडणघडण योग्य प्रकारे झाली पाहिजे. नवसमाजनिर्मिती, समता, विश्वबंधुत्व, सहनशीलता, प्रत्येकाची प्रगती,एकमेकांचे सहकार्य, उदात्त संस्कृतीचे संवर्धन, विषमतेचे निर्मूलन ह्या सर्व बार्बीचा विचार बालकांना समोर ठेवूनच करावा लागतो. कारण हीच भावी पिढी उद्याचा उज्ज्वल भारत घडविणार आहे.

आपला भारतीय इतिहास हा अद्‌भुत आहे. तो इतर देशांच्या तुलनेत वेगळा आहे. ब्रिटीश कालावधीत ग्रामांचे पारंपारिक स्वरूप बदलते. तसेच औधोगिक क्रांतीनेही १८ व्या शतकानंतर भारतीय समाजव्यवस्थेवर प्रहार केले आणि त्यामुळे पाश्चात्यांच्या अनुकरणातून भारतीय संस्कृतीच्या विचाराला कलाटणी मिळाली. ग्रामाचे स्वरूप बदलले. समाजव्यवस्थेचे स्वरूप बदलले . आचार विचार बदलले. सामाजिक जीवन ढवळून निघाले. उद्योगधंद्यात परिवर्तन, व्यवसायात परिवर्तन, शिक्षणात परिवर्तन, आर्थिक व तांत्रिक परिवर्तन आणि सर्व परिवर्तनातून संयुक्त कुटुंबाचे परिवर्तन हे विभक्त कुटुंबात झाले. परिणामी पूर्वीच्या ग्रामांचे स्वयंभू आणि स्वयंपूर्ण जीवन होते त्याला तडा गेला. आणि हा सर्व परिणाम औद्योगिक क्रांतीचा होय.

औद्योगिक क्रांतीने अनेक समस्यांना जन्म दिला. जसे : बेरोजगारी , वेश्याव्यवसाय, कामगारांच्या समस्या, झोपडपट्टी, कुमारी माता, तांत्रिक व तांत्रिक शिक्षणाचा प्रश्न, अनैतिक व बेजबाबदार वर्तन, मध्यपान अनेक नवीन रोग, गुप्त रोग हे सर्व औद्योगिक क्रांतीचे परिणाम आहेत. औद्योगिक क्रांतीने समाजव्यवस्थेला हादरवले. त्यातून कुटुंबव्यवस्था देखील सुटली नाही. परिणामी जलद शहरीकरण, औद्योगिकीकरण यातून सामाजिक समस्या या जलदगतीने निर्माण झाल्या. विशेषत! बालकांत या समस्या निर्माण झाल्या. औद्योगिकीकरण म्हणजे व्यवसायात बदल. पूर्वी परंपरागत शेती होती. ज्यावर अनेक माणसे जगवली जात असत कामांसाठी भरपूर

माणसांची गरज होती . ती शेती प्रधानता अवस्थेत उलट सद्यस्थितीत औद्योगिकरणाने व्यक्तीला विभक्त केले, एकल कोंडे, चिंताग्रस्त, समस्याग्रस्त , बेकार बनवून यातूनसुध्दा मुलांच्यामध्ये गंभीर परिणाम झाले. औद्योगिक क्रांतीतून नगरातून महानगरे अस्तित्वात आली.

ओद्योगिकीकरण व शहरीकरण याने समाजात व जगात भयानक समस्या निर्माण केल्या. विभक्त कुटुंब, मार्गदर्शनाचा अभाव, मुलांवर नियंत्रणाचा अभाव, कुपोषण,उपासमार, बेरोजगारी,अस्वच्छता तसेच महत्तम लोकसंख्या इत्यादी ज्वलंत समस्यामुळे भारतीय जनता दारिद्रात बुडत होती. औद्योगिक क्रांती आणि नागरीकरणाने, शहरीकरणाने यात भर घातली व त्याचा मुलावर गंभीर परिणाम झाला म्हणून महात्मा गांधींनी असे म्हटले आहे की "मूल हे देशाचा आधार स्तंभ आहे"! मुलांना संरक्षण देणे हे कोणत्याही देशाचे कर्तव्य म्हणून इ.स.१९५६ मध्ये भारतात ' हिंदू दत्तक ' व 'बालक सुरक्षित कायदा' निर्माण करण्यात आला.

सन १९५९ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने बाल हक्कांची घोषणा केली. यानुसार बालकांच्या मुलभूत गरजा-सकस आहार, आरोग्य, शिक्षण, मातृ-संरक्षण व कौटुंबिक काळजी, समान सामाजीक दर्जा आणि वंशिक व ईतर भेदभावांपासून संरक्षण यांची पूर्तता करण्यासाठी राष्ट्रसमुदायाच्या सहकार्याच्या आवश्यकतेवर व मातृत्त्वावर भर दिलेला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९७९ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय बालवर्ष"म्हणून जाहीर केले व सर्व सदस्य राष्ट्रांनी ते साजरे केले. त्यात अभूत पूर्व रितीने बालकांना प्रकाशझोतात आणले. विशेषतः बालकांच्या गरजा व समस्यांचा एक बालक व भावी प्रौढ म्हणून विचारविमर्ष करण्यात आला.

अनाथ, निराधार मुलांच्या सेवा व सुरक्षेच्या योजनाअंतर्गत सन १९७४-७५ पासून भारत सरकारच्या समाजकल्यान विभागाने राज्यातील बालकल्याण संस्थांसाठी विशिष्ठ अनुदाने देण्यास सुरूवात केली आहे. या योजनांत म्हणल्याप्रमाणे अनाथ मुलांच्या कल्याणकारी सेवांचे सर्वसाधारण उद्दिष्ट या मुलांना सामान्य नागरिक म्हणून समुदायात पुनः स्थापित करणे हे आहे. तसेच बालन्याय कायदा :२००० (ज्युवेनाईल जस्टीस ॲक्ट : २०००) मध्ये निर्माण करण्यात आला. यामध्ये ज्यांना १८ वर्ष पूर्ण नाही व आई - बाप व घराचा अधार नाही , ज्यांना विशेष आधाराची गरज आहे त्यांना 'अनाथ बालक' म्हणतात. परंतु , अनाथ मुले व त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणाऱ्या कल्याणकारी संस्था याबाबत मर्यादित अभ्यास केलेला आढळतो. ही बाब लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

<u>अनाथ बालकांची व्याख्या व अर्थ :</u>

बालकाभिमुख व्याख्या

भारतीय जनगणना कार्यालयाने केलेल्या व्याख्येनुसार - "१४ वर्ष वयाखालील मुलांना बालक समजले जाते."

बालहक्क जाहिरनाम्यानुसार बालकांना लागू असलेल्या कायद्यानुसार - "१८ वर्षाखालील मुलांना बालक म्हणतात".

अनाथ बालकांचा अर्थ व प्रकार

१) संपूर्ण अनाथ :

ज्या बालकांचे आई -वडील दोघेही मृत असतील, त्यांना संपूर्ण अनाथ मानण्यात येते.

२) अर्ध अनाथ :

ज्या बालकांचे आई किंवा वडील या दोहोपैकी एकजण मृत असेल त्यांना अर्ध अनाथ म्हटले जाते.

२) संशोधन विषयाची निवड :

"स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी" अशाच प्रकारे समाजात अनेक मुल जीवन जगताहेत. बालक हा राष्ट्राचा आधार असल्यामुळे त्याच्या सर्व गरजा पूर्ण होणे व सर्वांगीण विकास होणे हे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु परिस्थिती असतानाही लाखो बालके नाकारलेले, अनाथ पोरके जीवन जगताना, एक - एकटे संघर्ष करताना, दुःख उरात घेऊन जगताना दिसतात या सातत्याच्या घटनांमुळे एक ज्वलंत प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे "मुंबई उपनगरातील अनाथ मुलांचा एक चिकित्सक अभ्यास" हा अतिशय ज्वलंत विषय आहे. यामध्ये १० अनाथालयाचा व निवेदकांची संख्या ३०० असे अभ्यासाचे क्षेत्र असेल.

आज अनाथ बालकांचे प्रमाण वाढल्यामुळे समाजात एक भयानक स्थिती निर्माण होत आहे. व पर्यायाने समाजाचा विकास खुटंत आहे. तसेच सामाजिक व्यवस्थेतही विविध प्रकारे बिघाड निर्माण होत आहे. म्हणून या समस्यांवर उपाय सुचवीता यावे व सामाजिक व्यवस्था चांगली करता यावी यासाठी संशोधकाचे विषय निवडी मागचे प्रयोजन आहे.

३) अभ्यासाचा उद्देश :

१) मुले अनाथ होण्यामागे कारणीभूत घटक शोधणे व त्याचे सविस्तर विश्लेषण करणे.

२) अनाथ मुलांच्या वैयक्तिक, मानसिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करून त्याचे विश्लेषण करणे.

३) अनाथ बालकांच्या गरजा, समस्येचे स्वरूप व सामाजिक प्रभाव याविषयी अन्वेषण करणे.

४) अनाथ मुलांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी शासकीय व इतर कल्याणकारी संस्थांद्वारे पुरवण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा आढावा घेऊन परीक्षण करणे.

४) संशोधन अभ्यासाचा उद्देश :

१) निवेदकांची सद्यस्थिती, वैयक्तिक पार्श्वभूमी, छंद व सवयीचा अभ्यास करणे.

२) निवेदकांच्या आतापर्यंतच्या विकासाबद्दलची माहिती, सांस्कृतिक विकासाबद्दल अभ्यास करणे.

३) निवेदकांच्या कुटुंबाच्या समस्या, कुटुंबाची पार्श्वभूमी, सदस्यांचे शिक्षण, व्यवसाय, उत्पन्न जाणून घेणे.

४) निवेदकांची आपुलकी व विश्वासाच्या भावनेणे समस्या जाणून घेणे, भावनिक समाधान पुरविण्याचा प्रयत्न करणे.

५)निवेदकांचा सामाजिक दर्जा जाणून घेणे, सामाजिक विकासाबद्दल अभ्यास करणे.

६) निवेदकांच्या आरोग्याच्या समस्या जाणून घेणे, मिळणाऱ्या सुविधा पूर्ण की अपूर्ण ते जाणून घेणे.

७) निवेदकांच्या शिक्षणाची आवड लक्षात घेणे, आपल्या शिक्षणाबद्दल व भवितव्याबद्दल जागृत आहे का? ते पहाणे.

८) निवेदकाचा संस्थात्मक मनोवृत्तीचा अभ्यास करणे, सद्यस्थितीतील समस्यांचा आढावा घेणे.

९) निवेदकांच्या संपुर्ण वर्तनाचा अभ्यास करून वर्तन सुधारण्यासाठी सूचना व सल्याचे मार्गदर्शन करणे.

१०) निवेदकांचे भावी जीवनातील ध्येय व उद्देश जाणून घेऊन भविष्याच्या योजनांची माहिती जाणून घेणे.

११) सरकारी व निमसरकारी बालकांच्या योजनेची माहिती घेऊन त्यांना पुरवणे.

१२) समाज, स्वंयसेवी संस्था, शासन यांच्याकडून त्यांच्या पुनर्वसनाबाबत मूल्यमापन करणे.

१३) स्वंयसेवी संस्थाचे कार्यक्रम व कल्याणकारी योजनांचा थोडक्यात आढावा घेणे.

५) गृहीत कृत्ये / अभ्युपगम :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने दिशादर्शक स्वरूपात खालील गृहीत कृत्यांची मांडणी केलेली आहे.

१) घटस्फोटाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाल्यामुळे अनाथ बालकांच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत असावी.
२) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांना कायदेशीर स्वातंत्र्य मिळाल्यामुळे तसेच आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे या स्वात्रंत्र्याचे रूपांतर स्वैराचारात झाले व स्वैराचारातून अनैतिक संबंधात वाढ झाल्याने अनाथ बालकांची समस्या तीव्र होत चाललेली असावी.
३) स्वातंत्र्याचा व कल्याणकारी कायद्याचा दुरूपयोग झाल्यामुळे अनाय बालकांचे प्रश्न व कुटुंब संस्थेचे भवितव्य अडचणीत आले असावे.
४) पूर्वीच्या काळापेक्षा आजच्या काळातील विवाह पध्दतीत बदल झाला आहे. आंतर जातीय विवाह, प्रेम विवाह दिवसें दिवस वाढत असल्यामुळे अनाथ बालकांचे प्रमाण वाढत असावे.
५) कायद्यानुसार अनेक योजना बालकांना देण्यात आलेल्या हक्काची पायमल्ली दिसून येते म्हणजेच बालकांसाठी असलेले कायदे व धोरणात्मक तरतुदीची पूर्तता होत नसल्याचे जाणवते.
६) अनाथ बालकांच्या पुनर्वसन प्रकियेत विविध संस्थाचा असलेला सहभाग हा निराशाजनक वाटतो.
७) आधुनिक काळात लैंगिक स्वैराचारातून 'एडस' या रोगाची प्रचंड लागण होऊन अनाथांची समस्या तीव्र ज्वलंत बनली असावी.

६) संशोधन आराखडा :

संशोधन आराखडा हा शास्त्रीय सामाजिक संशोधनाची प्रमुख पायरी आहे. कोणतेही कार्य करण्यापूर्वी कार्याचा आराखडा तयार केला जातो. संशोधकाला त्या कार्याची पध्दतशीर नियोजन रूपरेषा आणि विषयाची मांडणी करावी लागते, यालाच आराखडा म्हणले जाते. मॅक्स ब्लॅकच्या मते "निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय घेण्याची प्रकियेला आराखडा म्हणतात."

अभ्यासाचे स्वरूप अन्वेषणात्मक /परिचयात्मक आहे. अन्वेषणात्मक संशोधनाचा उद्देश एखादा सामाजिक घटनेच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेणे हा असतो. शोधकर्ता, त्या

विशिष्ठ घटनेचे स्वरूप , तिचे परिणाम, त्या घटनेची वस्तुस्थिती , तिच्या मुळाशी असणारी कारणे, वस्तुनिष्ठ दृष्टिने शोधून काढण्याचा प्रयत्न करतो.

या अभ्यासातून अनाथ बालकांच्या सबंधित असणाऱ्या विविध पैलूंची माहिती घेऊन कार्यकारण संबंध स्पष्ट करण्यास मदत होईल. या अध्ययनासाठी अन्वेषणात्मक पध्दती निवडण्याचे मुख्य कारण म्हणजे अनाथ बालकांच्या समस्यांचे स्वरूप, परिणाम व वास्तवता यांकडे शोधकर्त्याचे लक्ष वेधून घेऊन या विषयावर भविष्यात अधिक सखोल संशोधन करण्यासाठी आधारभूत तथ्य उपलब्ध करून देणे.

७) अध्ययन क्षेत्र :

प्रस्तुत अध्ययनाकरिता संशोधकाने सन २०१७ ते २०२१ पर्यंतच्या कालखंडात मुंबई उपनगरातील अनाथ मुलांचे जीवनाविषयी अध्ययन क्षेत्र निवडले आहे.

मुंबई उपनगर जिल्हा हा कोकण विभागात समाविष्ट आहे. बांद्रा (Bandra) हे मुंबई उपनगर जिल्हाचे मुख्यालय आहे. जिल्हात उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर व उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर हे दोन उपविभागीय अधिकारी कार्यालये आहेत. तसेच अंधेरी, बोरीवली व कुर्ला ह्या तीन तालुक्यांचा समावेश आहे. यामध्ये १० अनाथालयाचा व निवेदकांची संख्या ३०० असे अभ्यासाचे क्षेत्र असेल. मुंबई उपनगर जिल्हात ८७ गावे आहेत. तसेच जिल्हात १० नगर रचना अधिकारी कार्यालये (CTSO) असून त्यात ४ लोकसभा मतदार संघ व २६ विधान सभा मतदार संघाचा समावेश आहे. जिल्ह्याचे अधिकारीता क्षेत्र बांद्रा पासून बोरीवली पर्यंत कुर्ल्यापासून मुलूंड पर्यंत आणि कुर्ल्यापासून ट्रॉम्बे पर्यंत आहे.

संदर्भ : www.mumbaisuburban.gov.in

८) नमुना निवड :

नमुना म्हणजे एका विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी होय. समूहातील प्रत्येक घटकांचे अध्ययन करणे कठीण असते. त्यामुळे संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील व्यवस्थाबध्द नमुना वापरण्यात येईल यामध्ये १० अनाथालयाचा व निवेदकांची संख्या ३०० असे अभ्यासाचे क्षेत्र असेल.

प्रस्तुत संशोधकांने संशोधनाचे क्षेत्र व व्याप्ती लक्षात घेऊन संशोधकांचे निवेदक बहुतांशी शासकीय संस्था, स्वंयसेवी संस्था, अनाथ आश्रम या ठिकाणावरून निवेदकांची निवड केली जाईल.

९) तथ्य संकलन :

प्राथमिक व द्वितीय स्त्रोताद्ववारे संशोधकाने संशोधन विषयातील तथ्याचे संपादन करून मिळालेल्या तथ्याचे परीक्षण करून त्यात काही कमरता नाहीत याची खात्री करण्यात येईल. तथ्यांचा व्यवस्थिय क्रम लावला जाईल. निवेदकाने दिलेल्या उत्तरांचे परीक्षण केले जाईल. अनावश्यक तथ्यांना वगळ्यात येईल.

१) प्राथमिक तथ्य :

संशोधनकर्त्याने प्रथम प्रयत्नातून प्राप्त केलेल्या तथ्यांना प्राथमिक तथ्य म्हणतात.यामध्ये उत्तम तथ्य संकलनासाठी निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत या तंत्राचा वापर केला जाईल.

२) द्वितीयक तथ्य :

द्वितीयक तथ्य संकलनात संशोधक लिखित, प्रकाशित,अप्रकाशित सर्व लिखित सामग्रीचा समावेश करेल. या माध्यमातून संशोधकाला अनाथ बालकाविषयी तथ्य व आकडेवाडी प्राप्त होईल, त्यामध्ये -

१) व्यक्तिगत प्रलेख.
२) सार्वजनिक प्रलेख.
३) रोजनिशी / दैनंदिनी.
४) पत्रे.

प्राथमिक व द्वितीयक तथ्य संकलन अनाथ बालकांच्या संदर्भात काळजीपूर्वक करण्यात येईल.

१०) अध्ययनाचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषय "मुंबई उपनगरातील अनाथ मुलांचा एक चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडण्यामागे माझा हा उद्देश आहे की, अनाथ मुलांच्या वैवक्तिक , मानसिक, सामाजिक,परिस्थितीचे अध्ययन करून मुले अनाथ होण्याप्रमाणे कारणीभूत घटक शोधणे. यामध्ये १० अनाथालयाचा व निवेदकांची संख्या ३०० असे अभ्यासाचे क्षेत्र असेल. अनाथ मुलांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी शासकीय व इतर कल्याणकारी संस्थादृवारे पुरवण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचा आढावा घेऊन परीक्षण करून अंमलबजावणी करावयास प्रवृत्त करणे व इतर काय उपाययोजना आखता येईल व त्या योजनांचा खरोखर वापर झाला तर समाजाचा विकास साध्य होईल व समाजाचा विकास साध्य होणे व पर्यायाने अनाथ मुलांचे समस्यांचे निर्मूलन होणे हाच संशोधकाच्या संशोधनाचा महत्वपूर्ण उद्देश आहे.

संशोधनातून त्यांच्या विविध समस्यांची गरजांची जाणीव करून देणे त्यांना मान सन्मान प्रतिष्ठा देणे. त्यांच्यासाठी सुरक्षाचे प्रयत्न करणे हा संशोधनाचा उद्देश आहे. सामाजिक संशोधनातून नवनवीन तथ्ये समाजासमोर येतात. त्यामुळे नवीन सिध्दांत व समस्यांचे उपाय सोडवण्याचेही प्रयत्न त्यातून केले जातात.

११) प्रकरण रूपरेषा

प्रस्तुत संशोधनात प्रकल्पाची रूपरेषा खालील प्रमाणे योजिले आहे.

प्रकरण पहिले

सारांश / प्रस्तावना

प्रकरण दुसरे

तथ्य संकलनात वापरण्यात आलेल्या पध्दती.

प्रकरण तिसरे

सारार्श

अनाथ बालके आणि शासकीय भूमिका महाराष्ट्र शासनाच्या बाल विकास योजना

प्रकरण चौथे

वैयक्तिक व कौंटुबीक माहिती कारणे व सद्यस्थिती

प्रकरण पाचवे

अनाथांच्या समस्या व गरजा

प्रकरण सहावे

समाजकार्यकर्त्यांची भूमीका व कार्य

प्रकरण सातवे

निष्कर्ष व सुचना,

एकंदरीत सारांश

१२) संदर्भग्रंथ सूची

अ.क्र	लेखक	पुस्तकाचे शिर्षक	प्रकाशक	प्रकाशन वर्ष
१	भागवत शोभा	आपली मुलं	राजहंस प्रकाशन पुणे.	२००१
२	आनंद आर.के	मुले अशी वाढवा	राजहंस प्रकाशन पुणे.	२००२
३	गोडेबोले मंगला	दत्तक घेण्यापूर्वी	नवचैतन्य प्रकाशन,मुंबई	२००३
४	गुप्ते ललिता	समाज माझा मी समाजाचा	उन्मेष प्रकाशन,पुणे	१९९१
५	काळे प्रेमला	बालमानसशास्त्र	श्रीविद्या प्रकाशन,पुणे	१९८६
६	परूळेकर आशा	शालेय सल्लागार	उन्मेष प्रकाशन,पुणे	१९९५
७	टांकसाळे प्राजक्ता	व्यक्ती सहकार्य	मंगेश प्रकाशन,नागपूर	२००३
८	कर्दळे आशा	मदर तेरेसा	राजहंस प्रकाशन,पुणे	२००३
९	चितळे रोहिणी	मुलांचे प्रश्न आणि मार्गदर्शक	उन्मेष प्रकाशन,पुणे	१९९१
१०	वाड विजया	आपली मुंल	पाटकर अरविंद,मुंबई	२००१

संशोधक

मोहिणी नारायणराव नाबदे
(पीएच.डी.प्रशिक्षणार्थी)

मार्गदर्शक

प्रो.डॉ.पी.पी.लोखंडे
(एमएसडब्ल्यू, पीएच.डी,सेट)
सहाय्यक प्राध्यापक
जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय सीडको,नांदेड